# ऑनलाईन ॲडमिशनबाबत...

सी. डी. जैन महाविद्यालयात कुठल्याही कोर्सला प्रवेश घेण्यासाठी -

१. प्रथम महाविद्यालयाच्या **cdjcollege.000webhostapp.com** वेबसाईटला भेट देऊन कोर्सबाबतची संपूर्ण माहिती नीट वाचून आणि समजून घ्यावी. प्रत्येक कोर्सचे **माहितीपत्रक** वेबसाईटवर उपलब्ध आहे.

२. त्यानंतर साईटच्या वरच्या भागातील 

बटनावर क्लिक करून Online Admission System मध्ये प्रवेश करता येतो.




३. Online Admission System मध्ये प्रथम Registration करावे. Registration करताना नाव, ई-मेल आयडी, मोबाईल नंबर, जन्मतारीख आणि पासवर्ड विचारला जाईल. ई-मेल आयडी आणि मोबाईल नंबर विद्यार्थ्याने स्वत:चाच द्यावा. **इतर कुणाचाही मेल आयडी किंवा मोबाईल नंबर देऊ नये.** कारण रजिस्ट्रेशन पूर्ण होण्यासाठी दिलेल्या मोबाईल नंबरवर त्वरीत ओटीपी पाठविला जातो. हा ओटीपी वापरून रजिस्ट्रेशनची प्रोसेस पूर्ण केली जाते आणि लगेच मोबाईलवर आणि ई-मेल आयडीवर रजिस्ट्रेशन नंबर आणि पासवर्ड कळविला जातो. (*मिळालेला आयडी आणि पासवर्ड सांभाळून ठेवल्यास प्रत्येक वर्षी प्रवेशासाठी तीच ती माहिती पुन्हा द्यावी लागत नाही.*)







४. मिळालेल्या रजिस्ट्रेशन आयडी आणि पासवर्डचा उपयोग करून साईटवर Login करावे. यशस्वीपणे लॉगीन झाल्यावर स्वत:च्या अकौंटमध्ये डाव्या बाजूला मेरीट फॉर्म, ॲडमिशन फॉर्म भरण्यासाठी आवश्यक त्या लिंक दिसतील. प्रथम मेरीट फॉर्म भरून त्याची प्रिंट काढावी. या प्रिंटसोबत मार्कशीटची आणि जातीच्या दाखल्याची (आवश्यक असल्यास) झेरॉक्स जोडून तो मेरीट फॉर्म दिलेल्या मुदतीत महाविद्यालयात प्रवेश समितीकडे जमा करावा.




५. महाविद्यालयात मेरीट यादी जाहीर झाल्यावर मेरीट यादीत नाव असलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा साईटवर लॉगीन करून प्रवेश अर्ज भरावा. प्रवेश अर्ज भरताना आधारकार्ड, बँक अकौंट इ. माहिती काळजीपूर्वक भरावी. तसेच स्वत:चा फोटो आणि सही साईटवर अपलोड करावी. प्रवेश फॉर्म पूर्णपणे भरून झाल्यावर त्याची प्रिंट काढा. त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडा.

६. यानंतर cdjcollege.000webhostapp.com साईटवरील Online Anti-Ragging Form बटनावर क्लिक करून **विद्यार्थ्यांने आणि पालकाने** Anti-Ragging चा फॉर्म भरावा. विद्यार्थ्यांने आणि पालकाने भरलेल्या फॉर्मची प्रिंट काढावी.




७. भरलेल्या Anti-Ragging चा फॉर्म प्रवेश अर्जासोबत महाविद्यालयात प्रवेश समितीकडून चेक करून घेऊन प्रवेश निश्चित करायचा आहे.

८. **या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना ऑनलाईन फी भरण्याची सुविधाही उपलब्ध करून दिलेली आहे. यासाठी विद्यार्थ्यांना डेबिटकार्ड/क्रेडिटकार्ड इत्यादींचा वापर करता येईल. प्रवेश निश्चित झाल्यावर लगेचच ऑनलाईन पैसे भरायचे आहेत. ऑनलाईन पैसे भरल्याची मोबाईलवर मिळालेली पोहोच २४ तासात महाविद्यालयाच्या कार्यालयात कॅशिअरला दाखवावी आणि त्यांच्याकडून प्रवेश फीची पावती घ्यावी.**

९. **ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश फीची सुविधा वापरायची नसेल असे विद्यार्थी नेहमी प्रमाणे महाविद्यालयाच्या कार्यालयात प्रवेश फी भरू शकतील.**

**महत्वाची सूचना**

**महाविद्यालयाच्या मेरीट यादीत नाव आलेल्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीतच प्रवेश फॉर्म भरावयाचा आहे. मुदतीत प्रवेश फॉर्म न भरल्यास त्या विद्यार्थ्याचा प्रवेशाचा हक्क (claim) राहणार नाही आणि अशा विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.**